येणेप्रमाणे मिळकत जल, तर, काष्ट, पाषाण, निधि, निक्षेपसंपूर्ण वस्तुंसह त्यातील असणारे भविष्यातील विजेचे मिटर, विज फिटिंग नळाचे पाणी, टॉयलेट, वापरण्याचे हक्कांसह दर्शविलेली मिळकत.

3) **मिळकतीचा इतिहास:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत ही आम्ही लिहून देणार यांनी रक्षिता कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. [illegible] व इतर 1 यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी घेतलेली असुन सदरचे खरेदीखताचा दस्त मे. सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक-4 यांचे कार्यालयात दस्त अनुक्रम नं. 7211/2018 अन्वये दिनांक 21/08/2018 रोजी नोंदविलेला आहे. सदरहु दस्तऐवजान्वये आम्ही लिहून देणार हे मिळकतीचे मालक झालेलो आहोत मिळकत ही आमचे कब्जे वहिवाटीत व उपभोगात आहे. मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईट्सला आमचे नांव 6ड फेरफार नोंद क्र. ________ अन्वये दाखल झालेले आहे. आमचा बिल्डर्स व डेव्हलपर्सचा व्यवसाय असल्याने आम्ही सदरहु हक्क व अधिकारांस अनुसरुन उपरोक्त कलम 1 यात वर्णन केलेल्या मिळकतीवर मिळकत विकसीत करण्याचे हेतुने आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या आहे. लिहून देणार यांनी वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर **"ओमशांती अपार्टमेंट ए"** या नावाने इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे बांधकाम आजमितीस प्रगतीपथावर आहे. सदरहु हक्क व अधिकारांस अनुसरुन लिहून देणार यांना सदर वर कलम 2 यात वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत विक्री अगर हस्तांतर करण्याचा व किंमतीची संपुर्ण रक्कम स्विकारण्याचा हक्क व अधिकार आहे त्या अधिकारात लिहून देणार यांनी वर कलम 2 मध्ये वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत विक्रीस काढली व याची जाण तुम्ही लिहून घेणार यांना झाली व त्यानुसार दोहो पक्षांत चर्चा होवून सौदा पक्का झाला व त्यानुसार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांचे लाभांत प्रस्तुतचा दस्त लिहून व नोंदवून दिलेला आहे.

4) **बिनशेती परवानगी:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत ही मे. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांचेकडील हुकूम नं. आरबी/डेस्क-III/एलएनए/एसआर/३०५/८१, दिनांक ११/०९/१९८१ अन्वये बिनशेतीकडे वर्ग केलेली आहे.

5) **मिळकतीचा ले-आऊट:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेली मिळकत

ही अंतिम मंजुर ले-आऊटमधील असुन सदरचा ले-आऊट हा नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे कार्यालयाकडून पत्र क्र. एल.एन.टी./आरबी/[illegible]/3059, दिनांक 07/08/1981 अन्वये मंजुर केलेला आहे.

6) **बांधकाम परवानगी व बांधकाम नकाशा मंजुरी:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर करावयाचे बांधकामासाठी लिहून देणार यांनी आर्किटेक्ट/पुरवाणकार श्री. [illegible] यांची व स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून श्री. [illegible] यांची नेमणूक केलेली आहे व त्यांचे देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम सुरु आहे. वर कलम 1 मधील मिळकतीवर करावयाचे बांधकामाचा नकाशा **नाशिक महानगरपालिका नगररचना विभागाकडून जावक नंबर एल.एन.डी./बीपी/पंचवटी/डीलोअल/0491/2018, दिनांक 13/10/2018** अन्वये मंजुर करुन घेतलेला असुन सदर नकाशा हा आर्किटेक्ट/पुरवाणकार व लिहून देणार यांच्या दप्तरी उपलब्ध आहे.

7) **टी.डी.आर.:-** सदरहु मिळकतीवर बांधकाम करतेवेळी लिहून देणार यांनी ________ चौ.मी. इतक्या क्षेत्राचा टी.डी.आर. खरेदी घेतलेला असुन सदरचे खरेदीखत मे. सह दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक यांचे कार्यालयात दस्त क्र. ______/______ दिनांक ________ रोजी नोंदविलेले आहे. सदरच्या मिळकतीवर लिहून देणार यांनी टी.डी.आर. वापरुन इमारत नकाशा तयार केलेला असुन सदर इमारत नकाशा व त्यानुसार इमारतीचे बांधकाम चालु केलेले आहे.

8) **प्रकल्प नोंदणी:-** लिहून देणार यांनी रिअल इस्टेट रेग्युलेशन अँन्ड डेव्हलपमेंट अ‍ॅक्ट 2016 नुसार वरील प्रकल्पाची नोंदणी केलेली असुन त्यांचा **नोंदणी क्र. P____________ असा आहे.** लिहून देणार यांनी सदरचा रियल इस्टेट रेग्युलेशन अँन्ड डेव्हलपमेंट अ‍ॅक्ट 2016 नुसार करारनामा लिहून घेणार यांचे लाभांत लिहून दिलेला आहे व रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट 1908 चे अधिन राहुन सह. दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देत आहे.

9) **बांधीव भाग विक्रीचा अधिकार:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या

Scanned by CamScanner